# NEWS HEADLINE 2023-24

GIS Morochi's students achieved success in various fields. News regarding the same are as follows. News are published in many newspapers like **“Punya-Nagari, Lokmat, Purogami Maharashtra & Tarun-Bharat.”**



पुण्य नगरी

## ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

नातेपुते / प्रतिनिधी

लोटस इंग्लिश मीडियम स्कूल, पंढरपूर यांच्या सौजन्याने आयोजित सहोदया कॉम्प्लेक्स इंटर स्कूल कबड्डी स्पर्धेत मोरोची येथील ग्लोबल इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

१७ वर्षाखालील वयोगटात मुलींच्या संघाने दुसरा क्रमांक, १४ वर्षाखालील वयोगटात मुलींनी तिसरा क्रमांक, तसेच मुलांनी तिसरा क्रमांक मिळवला. या यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षक पठाण, धीरज वजाळे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दत्तात्रय निटवे, सचिव डॉ.योगिता निटवे, मुख्याध्यापक ताहेर शेख, उपमुख्याध्यापक जिलानी आतार व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Smart Solapur Edition
Dec 10, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com

# पुण्य नगरी



# ग्लोबल इंटरनॅशनल स्कूलमध्ये पारितोषिक वितरण समारंभ

**नातेपुते / प्रतिनिधी**

कमी कालावधीमध्ये ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलचा नावलौकिक झाला असल्याचे मत माजी उपसरपंच प्रा.दुर्योधन पाटील यांनी व्यक्त केले. मोरोची येथे स्कुलच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन प्रसंगी पाटील बोलत होते.

या कार्यक्रमावेळी फलटण पंढरपूर रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष सोमनाथ वाघमोडे, संदीप वाघ यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी जि.प. सदस्या ऋतुजा शरद मोरे, माळशिरस पंचायत समितीचे उपसभापती किशोर सूळ, फलटण लोणंद रेल्वे संघर्ष समितीचे सोमनाथ वाघमोडे, नातेपुते पोलीस स्टेशनचे पोसई दिघे, संदीप वाघ, दत्तात्रय रुपनवर, राहुल वाघमोडे, धर्मराज माने, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दत्तात्रय निटवे, संस्थेच्या सचिव डॉ.योगिता निटवे, प्राचार्य ताहीर शेख, उपप्राचार्य जलील आतार आदी उपस्थित होते.

Smart Solapur Edition
Feb 13, 2024 Page No. 03
Powered by : eReleGo.com

# लोकमत

# मोरोचीत गुणवत्तापूर्ण शिक्षणावर मार्गदर्शन

# NEWS HEADLINE 2022-23

लोकमत



निवडीनंतर मृणाल मोरे याचा सत्कार करताना डॉ. दत्तात्रय निटवे, डॉ. योगिता निटवे, प्राचार्य ताहेर शेख, उपप्राचार्य जिलानी आतार आदी.

# इस्रो येथील अभ्यास दौऱ्यासाठी मृणाल मोरे यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**नातेपुते :** नोबेल फाऊंडेशन आणि भवरलाल अँड. कांताबाई जैन फाऊंडेशन जळगावद्वारा राज्यस्तरीय नोबेल सायन्स टॅलेंट सर्च परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

राज्यभरातून बसलेल्या विद्यार्थ्यांमधून अंतिम १६१ जणांची निवड करण्यात आले आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाने तर राज्य स्तरावरून १४ व्या क्रमांकाने ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल मोरोचीमधील मृणाल मोरे (इयत्ता सातवी) याची निवड झाली आहे.

या अभ्यास दौऱ्यात इस्त्रो स्पेस लॅब, आयआयटी, प्लाजमा अनुसंधान संस्था व इतर विज्ञान अभ्यासक्रम संदर्भात संस्थांना भेट देणार आहे. तसेच विद्यार्थी विज्ञान मंथन एनसीईआरटी, दिल्ली यांनी आयोजित केलेल्या नॅशनल लेव्हल सायन्स एक्झमा मध्येही तिचा सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला आहे. तसेच या परीक्षेत मौर्य निटवे यानेही सहभाग नोंदविला. या दोघांचा ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल मोरोचीचे चेअरमन डॉ. दत्तात्रय निटवे, सचिव डॉ. योगिता निटवे, विद्यालयाचे प्राचार्य ताहेर शेख, उपप्राचार्य जिलानी आतार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

Hello Solapur Gramin
Page No. 3 Jan 23, 2023
Powered by: erelego.com

# ग्लोबल इंटरनॅशनल मोरोची स्कूलच्या वतीने पत्रकारांचा सन्मान



विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक समीर पठाण सर यांचे मार्गदर्शन लाभले. यानंतर पत्रकारांनी मनोगत व्यक्त करतांना मोबाईल चे दुष्परिणाम या मुकनाट्याचे कौतुक केले.पुढे बोलताना ते म्हणाले पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. जी गोष्ट तलवारीच्या जोरावर कधीच करता येत नाही ती गोष्ट पेनाने

सोलापूर तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
22 Jan 2023 - Page 2

# मोबाईल अतिवापराचे दुष्परिणाम; पथनाट्याद्वारे जागृती

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २१ जानेवारी-**

मोरोची (माळशिरस) येथील ग्लोबल इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थिनींनी पत्रकारांच्या सन्मान कार्यक्रमात मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम मूकनाट्यातून बोलके चित्र निर्माण केले. या मूकनाट्यातून मोबाईलच्या अतिवापरातून होणारे दुष्परिणाम दाखवण्यात आले. मोबाईलचा अतिवापर करू नका, गरजेपुरताच वापर करा, असा संदेशही या मूकनाट्यातून या मुलींनी दिला.

